॥ श्री कुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न ॥

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

सर्व हिंदुस्थानांतील

# गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास

लेखक व प्रकाशक

गोविंद विनायक आपटे

( न्यायाचा-मासला ऊर्फ आपटे यांचा खटला, श्रीक्षेत्र निर्मळ वर्णन, श्रीक्षेत्र वांई वर्णन, अकबर ऐतिहासिक कादंबरी, कै. प्रो. विष्णुपंत छत्रे यांचे चरित्र, आपटे घराण्याचा इतिहास, बरवे घराण्याचा इतिहास, व संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास इ. पुस्तकांचे कर्ते. )

यांनी

पुणें, शनवार पेठ ५२६ येथें प्रसिद्ध केला.

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

भाद्रपद शु० ४ शके १८४४. आगष्ट ता. २६ इ. स. १९२२

किंमत ३। रुपये.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७
शनवार पेठ, पुणें.



कै॰ श्रीमंत सरदार आनंदराव खंडेराव रास्ते, पुणें.

# अर्पणपत्रिका.

श्रीमंत फर्स्टक्लास सरदार माधवराव आनंदराव ऊर्फ
रावसाहेब रास्ते यांच्या, पितृभक्ती, कुलाभिमान,
सरळ स्वभाव व औदार्य इत्यादि गुणांवर लुब्ध
होऊन त्यांच्याच आज्ञेनें त्यांचे कै० तीर्थ-
रूप आनंदराव खंडेराव ऊर्फ बाळासाहेब
रास्ते यांच्या स्मरणार्थ त्यांचे आ-
त्म्यास हा त्यांच्याच कुळाचा
इतिहास अर्पण करितों.

लेखक—

**गोविंद विनायक आपटे.**

# अनुक्रमणिका

( कोंकणांतील व देशावरील गांवांवरून तयार केली आहे. )


| नांव. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| प्रस्तावना, लेखकाचे-विचार व उपोद्घात | ... | ... | १ ,, १६ |
| गोखले-रास्ते घराण्याची माहिती | ... | ... | १ ते ३२ |
| ताम्हनमळा ,, ,, | ... | ... | ३२ ,, ४२ |
| कांदळ ,, ,, | ... | ... | ४३ ,, ४६ |
| पुणें म्यु. नं. ८५६।८५७ नं. ४ | ... | ... | ४६ |
| पुणें म्यु. नं. ५६३।८७ नं ५ | ... | ... | ४७ |
| वेंगुर्ला नं. ६ | ... | ... | ४७ ते ४९ |
| संस्थान औंध नं. ७ | ... | ... | ५० ,, ५१ |
| अंबेर व सांगोले नं. ८ | .. | ... | ५१ ,, ५२ |
| कल्याण, कारवाड व पुणें नं. ९ | ... | ... | ५२ ,, ५४ |
| पुणें म्यु. नं. ६८७ नं. १० | ... | ... | ५४ |
| कल्याण नं. ११ | ... | ... | ५४ |
| कल्याण नं १२ | ... | ... | ५५ |
| नाधवडे, पुणें व नाशिक नं. १३ | ... | ... | ५५ |
| वेळणेश्वर नं. १४ | ... | ... | ५६ |
| जुवाटी नं १५ | ... | ... | ५६ ते ५७ |
| मिरज व शिरहट्टी नं. १६ | ... | ... | ५७ ते ५८ |
| मुटाट येथील नं. १७ | ... | ... | ५८ ,, ५९ |
| केळेमाजगांव-पुणें नं. १८ | ... | ... | ६० |
| सोमेश्वर, गराड व पुणें (रावडी) | ... | ... | ६० ते ६६ |
| पोंबुर्ले, सायगांव व कोल्हापूर | ... | ... | ६६ ,, ६९ |
| खुद्द सोमेश्वर | ... | ... | ६९ |
| नागपूर येथील गोखले | ... | ... | ७० ते ७२ |
| जकातवाडी व बडोदें येथील गोखले | ... | ... | ७३ ते ७४ |
| गोवळ येथील गोखले | ... | ... | ७४ ,, ७८ |
| दाभोली येथील गोखले | ... | ... | ७८ ,, ८० |
| डोंगर, गोळप व पांवस येथील गोखले | ... | ... | ८० ,, ८४ |

| नांव | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| आडिवरें, अतकर, जमखंडी व पुणें येथील | ... | ... | ८४ ,, ८७ |
| नेवरें व पुणें येथील | ... | ... | ८७ ,, ९० |
| बिरवाडी येथील गोखले | ... | ... | ९० |
| गोळप, पेण व तासगांव येथील | ... | ... | ९० |
| पेण येथील गोखले | ... | ... | ९१ |
| तासगांव येथील गोखले | ... | ... | ९१ |
| गोळपचे पालकर–गोखले | ... | ... | ९२ |
| कोर्लें व मुंबई येथील | ... | ... | ९३ ते ९४ |
| मावळंगें येथील गोखले | ... | ... | ९४ ते ९५ |
| वेळदूळ–पनवेल येथील ,, | ... | ... | ९५ ,, ९६ |
| गिमवणें येथील ,, नं. १० | ... | ... | ९६ |
| पोंबुर्लें, कोरेगांव, वांई व चिकोडी येथील | ... | ... | ९६ ते ९७ |
| केतकी–विवली व उमरावती येथील | ... | ... | ९७ |
| वाडा-मारवेल व कोल्हापूर येथील | ... | ... | ९८ ते १०३ |
| वाई येथील नं. १४ | ... | ... | १०३ |
| गोखले ऊर्फ बडे | ... | ... | १०३ ते १०४ |
| जालिहाळ येथील गोखले | ... | ... | १०४ |
| महाडचे गोखले नं. १७ | ... | ... | १०४ |
| तासगांव येथील नं. १८ | ... | ... | १०४ ते १०५ |
| गोंवळ येथील (काशीकर) गोखले | ... | ... | १०५ |
| अणसुरें येथील गोखले | ... | ... | १०५ |
| आजगांव, पुणें व हरिपूर येथील | ... | ... | १०५ ते ११० |
| धाऊलवल्ली येथील गोखले | ... | ... | ११० ते १२१ |
| सासवड येथील ,, | ... | ... | १२१ ,, १२३ |
| धाऊलवल्ली ,, ,, | ... | ... | १२४ |
| बेळगांव ,, ,, | ... | ... | १२४ |
| द्वारका ,, ,, | ... | ... | १२४ ते १२५ |
| मिरज ,, ,, | ... | ... | १२५ ,, १३० |
| मुंबई येथील मोतिवाले | ... | ... | १३१ |
| पुणें मेहुणपुरा येथील | ... | ... | १३१ |
| हरिपूर, इचलकरंजी व कल्याण येथील | ... | ... | १३२ ते १३३ |
| धारवाड व मुंडगोड येथील | ... | ... | १३३ ,, १३४ |
| धाऊलवल्ली व मुंबई येथील | ... | ... | १३४ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| घाऊलवल्ली, केळशी, मुंबई व पुणें येथील ... ... | १३४ ते १३५ |
| पुणें सदाशिव पेठ घ. नं. ८३० येथील ... ... | १३५ ,, १३६ |
| होळी-दळे येथील गोखले ... ... | १३६ ,, १३८ |
| नाटे व भंडारा येथील ... ... | १३८ ,, १४६ |
| भायंदर येथील गोखले ... ... | १४७ ,, १४८ |
| गिमवणें येथील गोखले ... ... | १४८ ,, १६५ |
| दळे व मुंबई येथील ... ... | १६५ ,, १६७ |
| मिरज किल्ल्यांतील गोखले ... ... | १६७ ,, १७० |
| अलिबाग येथील ,, ... ... | १७० ,, १७१ |
| पोंबुर्ले येथील भुते गोखले ... ... | १७१ ,, १७३ |
| मणचें व पुणें येथील गोखले ... ... | १७४ ,, १७५ |
| अणसुरें, आपट व गिरे कुवेशी येथील ... ... | १७५ ,, १७७ |
| होळी-कुवेशी, गव्हाण व वाडा-खोल येथील... ... | १७७ ,, १८० |
| पिरंदवण, वाडी-तळेखाजण येथील ... ... | १८१ ,, २०१ |
| कऱ्हाड येथील गोखले ... ... | २०१ ,, २०४ |
| मिरज, उपळावी व सांगली येथील ... ... | २०४ ,, २१२ |
| सावळगी, जमखंडी व चिकोडी येथील गोखले व ऐतिहासिक पत्रें वगैरे ... ... | २१२ ते २१८ |
| तारळ येथील गोखले ... ... | २१८ ,, २२३ |
| पुणें म्यु. नं. ३१३ नारायणपेठ ...<br>नाधवडे पुणें पंढरीनाथ महादेव, ...<br>औंध- दिगंबर दत्तात्रय गोखले वगैरे ...<br>पृष्ठ २७ व ६४ मधील मजकूर ... | २२३ ,, २२६ |
| शके १४१० मधील अस्सल पत्र ... ... | २२७ ,, २२८ |
| कश्यप ऋषीची माहिती ... ... | २२९ ,, २३३ |
| अटघार, झांशी व छतरपूर येथील ... ... | २३४ ,, २३६ |
| विद्यमान पुरुषांची जंत्री ( शेवटीं ) ... ... | १ ,, ८४ |

पुस्तकांत ज्या पृष्ठांतून फोटो आहेत तीं पृष्ठें पुढील प्रमाणें:—

१, २३, ३१, ४०, ४८, ५९, ६३, ६५, ७२, ७७, ८५ ८८, ९४. १३०, १३९ व १८१.

पुस्तकांत फोटो जेथल्या तेथें देणें हें उत्तम ! परंतु तसें न घडण्याचें कारण लोकांकडून फोटो फार उशीरां आले हें होय. पुस्तकांत कांहीं चूक भूल झाली असल्यास क्षम्य कराल अशी आशा आहे. हा इतिहास प्रसिद्ध जाहल्यापासून यासंबंधीं एक वर्षाचें आंत कोणी कांहीं माहिती विचारल्यास कळविण्यांत येईल. ( टपाल खर्च सोबत ठेवावा. )

ज्यांनीं या कामाचें महत्व लक्षांत आणून, स्वसंतोषानें मदत केली त्या आश्रय दात्यांची नांवें:—श्री० फर्स्ट क्लास सरदार रावसाहेब रास्ते पुणें, रु० ५०० व पांच प्रति, शिवाय बक्षीस. ( पैकीं ३७५ रु. पोंचले. ) श्री. गंगाबाईसाहेब गोखले महेश्वर, रु. १२५. ( पैकीं २५ रु. पोंचले. ) श्री. हरी केशव गोखले मुंबई रु. १२५ पोंचले. श्री. नारायण रामचंद्र ऊर्फ नानबा गोखले ' लोकमान्य नाटक कंपनीचे ' मालक, रु. १००. ( पैकीं रु. १५ पोंचले. ) श्री. माजी अ. चीफजज्य रामचंद्र हरी गोखले बडोदे, रु. ५०. ( पैकीं रु. २५ पोंचले. ) श्री० रा. खंडेराव रास्ते जमखंडी रु. ५० पोंचले. श्री० बाळासाहेब रास्ते-गोशाळे वाई, रु.५०. ( पैकीं रु. ३५ पोंचले. ) राव. कृष्णाजी हरी गोखले पुणें, रु. ५०. ( पैकीं रु. ३० पोंचले. ) श्री. रा. विश्वनाथ हरी गोखले मुंबई रु. ५०. ( पैकीं रु. ४० पोंचले. ) श्री. रा. श्रीधर बळवंत गोखले नागपूर, रु. ५०. ( पैकीं रु. २५ पोंचले. ) श्री. रा. लक्ष्मण रघुनाथ ऊर्फ तात्यासाहेब गोखले, पुणें रु. ५०. ( पैकीं रु. २५ पोंचलें. ) श्री. रा. दत्तात्रय गोविंद गोखले मुंबई रु. ५० पोंचले. ..

# प्रस्तावना

**कोंकण.**

परशुरामानें क्षत्रियांच्या कोपानें निःक्षत्रीय पृथ्वी एकवीस वेळां करून शेवटीं अश्वमेध यज्ञ केला व ब्राह्मणांस सर्व पृथ्वी दान दिली, अशी कथा पुराणांतून प्रसिद्ध आहे. पृथ्वी दान दिल्यावर आपल्यास राहावयास जागा पाहिजे म्हणून परशुरामानें समुद्रापासून सह्याद्रीच्या पश्चिमेस जागा मागून घेतली तें हें परशुराम क्षेत्र अगर कोंकण होय, अशी ही पौराणिक कथा आहे. सह्याद्रीपासून समुद्र हटलेला दिसतो या भौगोलिक परिस्थितीवर ही कथा रचली आहे, हें उघड आहे. या भूमीस नांव कोंकण असून तें मूळच्या द्रविड लोकांनीं दिलेलें आहे. या देशांत मूळ द्राविडी वंशाच्या लोकांची व विशेषतः कोळी ( कैवर्त ) वगैरे लोकांची वस्ती होती. येथें भारतीय आर्य लोकांची वसति कधीं झाली याचा आपण ऐतिहासिक दृष्ट्या विचार करूं.

महाभारतांत परान्त आणि अपरान्त असे दोन देश उत्तरेकडील आर्य देशांच्या यादींत आहेत ( भीष्म. अ. ९ ), यांचे दाक्षिणेकडे जे द्राविड देश आहेत त्यांच्या यादींत कोंकण हें नांव आहे; यावरून महाभारतकाळीं परान्त म्हणजे हल्लींचा सुरत जिल्हा आणि अपरान्त म्हणजे हल्लींचा ठाणें जिल्हा यांत आर्यांची वस्ती झाली होती. अर्थात् इ. स. पू. ३०० च्या सुमारास अपरान्तांत आर्य लोक आले होते. बुद्धाच्या ( इ. स. पू. ५०० च्या ) सुमारास ते येथें नव्हते. किंवा फार थोडे होते. कारण, बुद्धानें आपला शिष्य पूर्ण यास अपरान्तांत आपला धर्म उपदेशिण्यास पाठविलें. त्या वेळीं तेथील लोकांच्या क्रूर स्वभावाचें आतिशय भयंकर वर्णन केलें आहे. असो; तर बुद्ध काळापासून म्हणजे इ. स. पू. ५०० पासून ३०० शेंपर्यंत येथें आर्यवस्ती झाली आणि बौद्धधर्म आणि आर्यधर्म दोन्ही येथें प्रचलित झाले असें ऐतिहासिक दृष्ट्या मानतां येतें.

आर्यधर्मी ब्राह्मण अपरान्तांत येऊन राहिले तेच बहुधा हल्लींच्या कोंकणस्थांचे पूर्वज असावेत असा माझा तर्क आहे. कोंकणस्थांत परशुराम हें दैवत नाहीं. इतर बहुतेक आर्यांप्रमाणें कोणी तरी महादेव कोणी तरी देवी त्यांचें कुलदैवत असतें. परंतु कोंकणस्थांचा आणि परशुरामाचा संबंध प्राचीन दिसतो. येथें ही गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, परशुरामाचें प्राचीनतम स्थान पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर आहे. तेथें वैतरणानदी आणि महेंद्रपर्वत असून परशुरामाची वेदी आहे. महाभारतांत वनपर्वांत पांडव तीर्थयात्रेसाठीं फिरले त्या वेळीं पूर्व समुद्रावर त्यांनीं परशुरामाचें दर्शन घेतलें, असें वर्णन आहे ( वन. अ. ११५ ) तें येथेंच.

रेणुकेचा वध व क्षत्रियांचा निःपात वगैरे परशुरामानें केलेल्या पराक्रमाची कथा महाभारतांत येथेंच दिली आहे. कश्यपास पृथ्वीदान केल्यावर परशुराम महेंद्र पर्वतावर वास करूं लागला असें त्यांत वर्णन आहे. अर्थात् सह्याद्रीपासून समुद्रास मागें सारून आपल्याकरितां परशुरामानें नवीन क्षेत्र निर्माण केलें ही कथा मागाहूनची आहे. हें पूर्वेकडचेंच परशुरामाचें क्षेत्र व ब्राह्मण पश्चिमेस शूर्पारक क्षेत्रांत आले असें दिसतें. ज्याप्रमाणें युधिष्ठिरहि पूर्व समुद्रावरून गोदावरी द्राविड देशांतील नारीतीर्थ वगैरे तीर्थें पहात पहात अत्यंत पवित्र अशा शूर्पारक क्षेत्रांत आला, असें वर्णन वनपर्व अ० ११८ यांत आहे, तसेंच हे लोक आले असावे असा तर्क होतो. यांत पश्चिमेकडील अन्य तीर्थांचें नांव नाहीं. शूर्पारक क्षेत्र म्हणजेच अपरान्त आणि शूर्पारक अथवा सोपारें हें पूर्वकाळीं मोठें व्यापाराचें बंदर होतें. तेथें युधिष्ठिरानें समुद्रकांठचा प्रदेश उल्लंघन केल्यानंतर तपस्वी लोकांच्या समुदायांनीं भरलेली धनुर्धर श्रेष्ठ राम याची वेदी पाहिली. तेथें नंतर अनेक इंद्र. वरुण वगैरे वैदिक देवतांचीं मंदिरें अवलोकन केलीं. नंतर तो शूर्पारकास परत येऊन, प्रभास क्षेत्रास गेला असें वर्णन महाभारतांत आहे. ( भाषांतर पान २४६ पु. दोन–वनपर्व ) यावरून या काळीं शूर्पारक क्षेत्रांतच ब्राह्मण वस्ती असून तेथेंच परशुराम क्षेत्र होतें आणि तें अद्यापि आहे ही गोष्ट वाचकांस सांगितली पाहिजे. सोपाऱ्याच्या पूर्वेस डोंगरांत वज्रेश्वरीच्या बाजूला अजून वैतरणी नदी आणि परशुराम क्षेत्र आहे. महाभारतांत अन्य ठिकाणीं सुद्धां परशुरामानें समुद्रापासून जमीन घेतली तें शूर्पारक क्षेत्र होय; आणि तेंच अपरांत महीतल असें वर्णन आहे. स्कंदपुराण सह्याद्रि खंडांतहि असेंच सांगितलें आहे. आणि येथें कोंकणस्थ ब्राह्मण परशुरामानें उत्पन्न केले असें वर्णन आहे. ते श्लोक असे—

रामेण निहताः क्षत्रा एकविंशति वारतः ।
ब्राह्मणानां ततः पृथ्वी दानं दत्त्वा यथाविधि ॥
नवीनं निर्मितं क्षेत्रं शुर्पारकमनुत्तमम् ।
वैतरण्या दक्षिणेन सुब्रह्मण्यास्तथोत्तरे ॥
सह्यात्सागरपर्यंतं शूर्पाकारं व्यवस्थितम् ॥

असो; तर कोंकणस्थांची वस्ती शूर्पारक क्षेत्रांत असून तेथून पूर्वेस डोंगरांत परशुरामाचें स्थान होतें. वैतरणा नदी येथें प्रसिद्ध आहे. तिच्या दक्षिणेस शूर्पारक क्षेत्र बरोबर आहे. पण सुब्रह्मणी नदी कोणती हें सांगतां येत नाहीं. या ठिकाणाहून कोंकणस्थ चिपळूण शहरास केव्हां गेले हें सांगणें कठीण आहे. शकांनीं अपरान्त देश जिंकला तेव्हां म्हणजे इ. स. १०० च्या सुमारास ते तेथें गेले असावेत आणि तेथें आतांपर्यंत त्यांची वस्ती आहे. परशुरामाचें स्थानही त्यांनीं आपल्याबरोबर चिपळूणाजवळ नेलें हें साहजिक आहे. पुढें ज्या वेळीं ब्राह्मणभेद

देशभेदानें झाले त्या वेळीं त्यांस चिपळोणे किंवा चित्तपोलनाहा असे म्हणवूं लागले. सर्व हिंदुस्थानांत हा प्रकार इ. स. दहाव्या शतकाच्या नंतर घडला असें निश्चित म्हणतां येतें. कारण तोंपर्यंत कोणत्याहि शिलालेखांत किंवा ताम्रलेखांत ब्राह्मणांचीं देशभेदावरून निरनिराळीं नांवें पडलेलीं दिसत नाहींत. सर्वत्र नुसता गोत्रभेदाचा उल्लेख अशा लेखांत सांपडतो. याच्यानंतर कनोजे ( कनोज ), नागर ( नगर ), दसोरे ( दशपूर ), श्रीमल्ली (श्री माली), गौडा (गुड), बंगाली ( बंगाले ) वगैरे उत्तरेकडील नांवें व गोवर्धन (नाशिक), चित्तपावन ( चिपळूण ), देवरुखे ( देवरूख ), कऱ्हाडे ( करहाटक ), देशस्थ ( देश ), तेलंगी (तेलंग) इत्यादि शहरांवरून व देशांवरून ब्राह्मणांचे भेद होऊन त्यांचा आपसांत विवाह बंद पडून फक्त स्वतःच्या संकुचित प्रांतांतच प्रचलित राहिले. तात्पर्य, ऐतिहासिक साधनांवरून असें म्हणतां येतें कीं, इ. स. १०० राच्या सुमारास कोंकणस्थ हल्लींच्या कोंकणांत आले, व त्यांची एक विशिष्ट ब्राह्मण जात इ. स. १००० राच्या नंतर कायम बनली ती अद्यापपर्यंत आहे.

इ. स. १०० राच्या सुमारास कोंकणस्थ हल्लींच्या कोकणांत आले याज-बद्दल आणखी पुरावा हरिवंशांत मिळतो. हरिवंश हें पुराण सर्वांत जुनें असून इ. स १०० सुमाराचें आहे. श्रीकृष्ण, जरासंघभयानें दक्षिणेंत आला तेव्हां कोल्हापुराच्या दक्षिणेस श्रीकृष्णाची आणि परशुरामाची गांठ पडली. आणि परशुरामानें गोमांचल पर्वत तुम्हास रहावयास सुरक्षित आहे असें रामकृष्णास सांगितलें, असें त्यांत वर्णन आहे. यावरून शूर्पारक क्षेत्राहून परशुरामाचें क्षेत्र या काळीं आणखी खालीं दक्षिणेस आलें होतें असें स्पष्ट दिसतें. येथेंच कोंक-णस्थ ब्राह्मण आज सुमारें १८०० शें वर्षे राहात आहेत. त्यांस येथोन हालावें लागलें नाहीं याचें कारण त्या ठिकाणची सुरक्षितता होय. रत्नागिरी जिल्हा बहुतेक डोंगरांनीं व्याप्त असून उत्पन्नालाहि कमी आहे. यामुळें राजकीय घडामो-डींत त्याजवर जेते लोकांचा फारसा डोळा नव्हता; अर्थात् राजकीय घडामोडी येथें फारशा झाल्या असें दिसत नाहीं.

माझ्या मतें मूळ कोंकण हें नांव रत्नागिरी जिल्ह्यासच महाभारतकाळीं होतें. ह्या जिल्ह्यांत सह्याद्रिपासून तों थेट समुद्रापर्यंत लहान लहान टेकड्या पसरल्या असून हवा उत्कृष्ट आणि पाणीहि उत्कृष्ट आहे. त्यामुळें रहावयास हें क्षेत्र चांगलें असून ज्यांस फार श्रीमंत होण्याची महत्वाकांक्षा नाहीं, त्यांस हें क्षेत्र बरें आहे. येथें उत्पन्न शेतकीचें थोडें होतें; तथापि नारळ, सुपारी, काजू वगैरेचें उत्पन्न बरेंच आहे. येथील डोंगरांत दक्षिणेकडील कारवाराप्रमाणें जंगल फार नसल्यानें येथील हवा चांगली आहे. पूर्वकाळीं ठाणे जिल्ह्यांत जंगल अति-शय असून अपरान्तांत हत्ती पुष्कळ होते. किंबहुना तेथील हत्तींची उत्तम म्हणून ख्याती होती, असें महाभारतांतील एका वर्णनावरून दिसतें. याशिवाय या

जिल्ह्यांत सखल प्रदेश असण्यानेंहि अपरांताची हवा चांगली नाहीं. परंतु भातशेतीचें उत्पन्न मोठें असल्यानें व उत्तरेस लागून हा प्रदेश असल्यानें येथें राज्यक्रांत्या फार झाल्या. कुलाबा जिल्ह्याचीहि स्थिती थोडीफार अशीच आहे. शेतीचें उत्पन्न मोठें असलें तरी हवा तितकी निरोगी नाहीं, आणि राजकीय घडामोडी फार ! तात्पर्य, कोंकणस्थ ब्राह्मणांनीं स्वस्थ बसून वैदिक आचार कायम ठेवण्याकरितां जो प्रांत पाहिला तो उत्तम होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोंकण हें नांव मूळ या प्रांताला असून प्राचीन काळींच म्हणजे इ. स. १००० च्या सुमारास त्याची व्याप्ति जास्त वाढली हें खरें आहे. प्राचीन लेखांत सप्त कोंकणाचा उल्लेख येतो. म्हणजे मला वाटतें अपरांतापासून थेट केरळापर्यंत निरनिराळीं सात कोंकणें होतीं. ह्युएनसंगाच्या काळीं हल्लींप्रमाणें धारवाडच्या दक्षिणेस घाटावर कांहीं कोंकणस्थ लोकांची वस्ती असून त्या प्रांताचें कोंकणपूर असें नांव दिलें आहे. पण ऐतिहासिक मूळ कोंकण म्हणजे हल्लींचा रत्नागिरी जिल्हाच होय आणि याच जिल्ह्यांत राहणारे मूळचे कोंकणस्थ ब्राह्मण होत. ठाणे जिल्ह्यांत तर व कुलाबा जिल्ह्यांतहि कोंकणस्थांची हल्लीं पुष्कळ घरें आहेत. पण ते सर्व पेशवाईचे काळांत इकडे आलेले असून प्रत्येक कुटुंबास आपण मूळ कोंकणांतून कोठून व केव्हां आलों याचें चांगलें स्मरण आहे. ते बहुधा दोनशें वर्षांतले असून त्यांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांतच आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील कोंकणस्थ ब्राह्मणांस मात्र आपण बाहेरून कोठून केव्हां आलों याचें निश्चित स्मरण नाहीं. यावरून व एकंदर ऐतिहासिक समालोचनावरून कोंकणस्थ ब्राह्मण कोंकणांत फार प्राचीन काळीं इ. स. १०० च्या सुमारास आले असें अनुमान निघतें.

**कोंकणस्थांची उत्पत्ति.**

आतां आपण कोंकणस्थांच्या वंशाचा अर्थात् उत्पत्तीचा विचार करूं. इ. स. १००० नंतर प्रत्येक प्रांतांत राहणाऱ्या निरनिराळ्या पोटजाती तुटक झाल्या आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र चारी मुख्य जातींत हजारों पोटजाति उत्पन्न झाल्या असें आपल्यास प्राचीन ऐतिहासिक लेखांवरून म्हणतां येतें. त्यांत विशेषतः प्रांत व नगर भेदानें या जाति उत्पन्न होऊन त्यास त्यावरून नांवेंहि पडलीं. कोंकणांत राहणारे कोंकणस्थ किंवा मुख्य शहरावरून चिपळोणे असें त्यांस नांव पडलें. चित्तपावन हेंहि नांव याच शहरावरून पडलें असें राजवाडे म्हणतात तें बरोबर आहे. या पोटभेदाच्या संकुचितपणांत प्रांतभेद तर आहेच पण कांहीं खाण्यापिण्याचे भेदहि आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोंकणस्थ पहिल्यापासून निवृत्तमांस दिसतात. अर्थात् मांस खाणारे किंवा नुसते मासे खाणारे इतर ब्राह्मणांपासून ते विलग पडले हें उघड आहे. पर

प्रांतांतला ब्राह्मण कशा तऱ्हेचा आहे आणि तो ब्राह्मण आहे कीं नाहीं या शंकांमुळें आपल्याच प्रांतांत आपल्याच जातींत मुलगी देण्याचा प्रघात जारी झाला व दृढ झाला. नागरांच्या इतिहासांत अशी कथा आहे कीं, एक मांग परदेशस्थ ब्राह्मण समजला जाऊन पुढें तो एकाचा जांवई झाला. गोष्ट उघडकीस आल्यानंतर अर्थात् लग्नाचे कडक नियम नागरांनीं अमलांत आणिले. तात्पर्य हें कीं, खानपानादि भिन्नतेमुळें आणि प्रांताप्रांतात दळण वळण कमी असल्यानें हे पोटजातीचे भेद दृढ झाले. याचा काळ इ. स. १००० च्या सुमाराचा आहे.

पण, ह्याजबरोबर एकमेकांच्या विषयीं क्षुद्र भावना व आमची जात श्रेष्ठ अशा अहंमन्यतेच्या कल्पना सुरू झाल्या. यामुळें या काळीं जातींच्या उत्पत्तीच्या मत्सरयुक्त भ्रांत कल्पना सुरू होऊन कथाहि बनल्या; त्या निरनिराळ्या पुराणांत विशेषतः स्कंदपुराणांत घुसडल्या गेल्या. कोंकणस्थांची जेव्हां पोटजात बनली तेव्हां १४ गोत्रें त्यांत होतीं. हें मूळ धरून ब्राह्मणोत्पत्तिमार्तंड या नूतन ग्रंथांत अशी कथा दिली आहे कीं, परशुरामास यज्ञ करावयास जेव्हां आपल्या नूतन भूमींत ब्राह्मण मिळेनात तेव्हां त्यानें १४ कैवर्त अथवा कोळी यांस ब्राह्मण करून घेतले, आणि त्यांस चौदा गोत्रें दिलीं. पण मग या ब्राह्मणांना बायका कोठून मिळाल्या आणि त्यांचा वंश कसा चालला हें या कथेंतून निघत नाहीं. शिवाय परशुरामानें ( सर्वे च गौरवर्णाश्च सुनेत्राश्च सुदर्शनाः । सर्वविद्यानुकूलाश्च भार्गवस्य प्रसादतः ॥ ) आपल्या प्रसादानें गोरे सुस्वरूप आणि विद्यावान केले; हें वर्णन बरोबर आहे. पण कोळ्यांचे झालेले ब्राह्मण असे होऊं शकत नाहींत. असो. या वर्णनावरून व खऱ्या वर्णनावरून हे मूळचे आर्य आहेत हेंच निश्चित दिसतें. पण या वर्णनानुकूल एक दुसरी कथा बनविली आहे व ती अशी कीं, चौदा प्रेतें वाहून आलीं होतीं, तीं शुद्ध करून परशुरामानें जिवंत केलीं. याप्रमाणें हे ब्राह्मण मूळचे इजिप्शन, ज्यू, पारशी असावे असा तर्क कित्येक बांधतात. पण ही चित्तपावन (चितापावन) या नांवावर बसविलेली कोटी आहे. अशा कोट्या नेहमींच त्याज्य असतात. शिवाय यांना बायका कोठून मिळाल्या ? बरें. परकी लोकांचा भारती आर्यांत सहज प्रवेश होऊं शकतो, ही समजूत अत्यंत चुकीची आहे. वर्णसंकराच्या भयंकर पातकाची हिंदुस्थानांत हजारों वर्षांपासून भगवद्गीतेच्या काळापासून भीति मानली गेली आहे. तेव्हां समुद्राच्या तुफानांतून वांचलेलीं चौदा परकीय कुळें ब्राह्मण बनलीं आणि त्यांनीं वाटेल तीं चौदा गोत्रें मिळविलीं आणि वेदविद्यादि जागृत ठेविली ह्या गोष्टी असंभाव्य होत. परकी लोकांचें अगोदर वेदावर प्रेम बसावाचें नाहीं आणि त्यांच्या जिव्हेंतून वेदाक्षर स्पष्ट व शुद्ध निघावयाचें नाहीं. कोंकणस्थांत वेदविद्या प्राचीन काळापासून जागृत आहे. ती त्यांनीं पेशवाईंत संपादन

केलेली नाहीं. येवढीच गोष्ट त्यांच्या भारतीय आर्यत्वाची साक्ष पुरेशी देत आहे असें आम्हांस वाटतें.

प्राचीन काळीं सर्व ब्राम्हण एक होते. त्यांच्यांतले हल्लींचे देशस्थ, कोंकणस्थ, बंगाली, द्राविडी वगैरे भेद इ. स. १००० (हा आकडा ठोकळ आहे.) नंतरचे आहेत. अर्थात सर्व ब्राम्हणांत गोत्रें एकच आहेत व प्रवरहि एकच आहेत. सर्व वेदांच्या सूत्रांतून प्रवराध्याय आहेत. त्यां सर्वांतील गोत्रप्रवर एकच आहेत. अर्थात बंगाली ब्राम्हण काश्यप गोत्री आहेत. आणि कोंकणस्थहि आहेत आणि तेलंगीहि आहेत. आणि या सर्वांत काश्यप गोत्राचे प्रवरहि एकच आहेत. किंबहुना पूर्वकाळीं ब्राह्मणांत देशभेदहि नव्हता आणि आडनांवेंहि नव्हतीं. इ. स. १००० च्या पूर्वीचे जे शिलालेख ताम्रलेख वगैरे आढळतात त्यांत ब्राह्मणांचें वर्णन फक्त गोत्रानें केलेलें असतें. गुजराती, कनोजिया, देशस्थ असें नसतें किंवा पटवर्धन, तिवारी, त्रिपाठी असेंहि नसतें. अर्थात आडनांवें अलीकडचींच आहेत. ज्या वेळेस कोंकणस्थ ही पोटजात निराळी ठरली त्या वेळीं त्यांच्यांत १४ गोत्रें आणि सुमारें ६० आडनांवें म्हणजे कुटुंब-नांवें होतीं असें दिसतें. आडनांवांस उत्तरेकडे नुख म्हणतात. अलीकडच्या ताम्रादि लेखांत अन्वय शब्द आडनांवार्थी वापरलेला दिसतो. हीं साठ कोंकणस्थांतील आडनांवें कशावरून पडलीं हा एक मनोरंजक पण कठीण प्रश्न आहे. राजवाड्यांचे मतें आडनांवें गोत्रांवरूनच उत्पन्न झालीं असावीं. अशीं आडनांवें बरींच आहेत. कांहीं आडनांवें गांवांवरून कर प्रत्ययांनीं उत्पन्न झालीं तीं तर सहज ओळखण्यासारखीं आहेत. कांहीं नांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत. कांहीं अधिकारावरून, हीं हि ओळखूं येतील, पण येवढे सर्व प्रकार वजा करूनहि कित्येक नांवांचें अद्याप निर्वचन कठीण आहे. पटवर्धन हें आडनांव अधिकारवाचक असून ते प्राचीन (इ. स. १००० च्या पूर्वींच्या) लेखांत मराठ्यांचे किंबहुना तेलंगणांतील सुद्धां आहे. मूळ साठांतील गोखले, दामले, आपटे, परांजपे, रानडे, लेले, मेहेंदळे, लवाटे वगैरे आडनांवांचा अर्थ लावणें कठीण आहे. हे शब्द अनेकवचनी आहेत यांत शंका नाहीं. एकवचनीं गोखला हा शब्द मुळांत गोखल असा असावा, आणि तो शब्द कोणातरी पवित्र आचरणी सन्मान्य पुरुषावरून त्याच्या कुलाला पडला असावा. एका ऋषीचें नांव गोखलः एके ठिकाणीं पाहिल्याचें मला स्मरतें आहे. या वेळीं ठिकाण पत्ता दाखवूं शकत नाहीं. गोखलः गोत्रऋषी नव्हे हें उघड आहे. गोत्रऋषीच्या कुळांत पुढें कोणी नामांकित पुरुष झाला त्यांवरून तें नांव पुढें चालू झालें.

असो; आतां शेवटीं एका प्रश्नाचा विचार करणें अवश्य आहे. कोंकणस्थ ब्राह्मण जर बुद्धिमान विद्यासंपन्न प्रथमपासून आहेत आणि ते कोंकणांत हजार

अठराशें वर्षांपासून आहेत तर त्यांचें नाव इतिहासांत पेशवाईपूर्वी कां दिसत नाहीं. असा प्रश्न उपस्थित होतो व कित्येकदां विचारलाहि जातो. कोंकणांतच नव्हे इतर प्रांतांत तें कां प्रसृत झाले नाहींत, प्राचीन इतिहासांत शिलाहार, राष्ट्रकूट, चालुक्य वगैरे राजकुलांच्या आमदानींत कोंकणांतून ठाण्यांत, घाटावर, देवगिरीस कोंकणस्थ ब्राह्मणांचे दिवाण अधिकारी वगैरे कोठें दिसून येत नाहींत. याचें कारण काय? याचें उत्तर असें दिसतें कीं, पूर्वी ब्राह्मण राजकारणांत पडत नव्हते असें नाहीं, पण ते थोडे असत; शिवाय कोणत्याहि राज्याचें मुख्य ठिकाण कोंकणांत कधींच नव्हतें, आणि कोंकणस्थांत वेदाध्ययन करून स्नानसंध्येंत काल घालविणारे व चरितार्थाकरितां उत्तम शेती करणारेच लोक पुष्कळ होते. व्यापार आणि राजकारण यांत मन घालणारे लोक थोडे होते. ज्या वेळेस जातीजातींच्या निंदात्मक कथा उत्पन्न झाल्या त्या वेळेस ( इ. स. १००० च्या नंतर ) कोंकणस्थांची स्थिति कशी होती हें पुढील श्लोकावरून दिसून येतें. परशुरामानें माझें स्मरण केव्हांहि करा, मी तुम्हांस मदत करीन, असें कोंकणस्थांस सांगितलें होतें. तेव्हां एकदां त्यांनीं उगीच परशुरामाची परीक्षा पाहण्यासाठीं त्याचें स्मरण केलें, तेव्हां तो तात्काळ येऊन संकट विचारूं लागला; तेव्हां कांहीं नाहीं म्हणोन म्हणतांच त्यानें शाप दिलाः——

शापप्रभावान्मे सर्वे कुत्सिताश्च दरिद्रिणः ।
सेवां सर्वत्र कर्तारः इदं निश्चयभाषणम् ॥

यावरून त्या काळीं कोंकणस्थांची स्थिति सुखसंपन्न होती. कोणत्याहि गोष्टीची त्यांस ददात नव्हती. किंबहुना मराठ्यांच्या इतिहासांत असें लोक समजत असल्याचे दाखलेही आहेत. तथापि, काशीस फार प्राचीन काळीं गेलेलीं कोंकणस्थकुळें आहेत असें मला वाटतें. त्यांचा इतिहास रा. गोविंदराव आपटे हे हळुहळु जगतापुढे ठेवितील. हीं कुळें वैदिक ब्राह्मणांचीं असून नामांकित आहेत.

वैदिक विद्या व आचार किंवा सेवा याचसाठीं कधीं कधीं बाहेर जाणारे कोंकणस्थ पूर्वकाळीं असत. पण त्यांची बुद्धिमत्ता व त्यांचें धोरण, शौर्य, साहस इत्यादि राजकीय गुण त्यांच्या ठिकाणीं हजारों वर्षे झांकलेले होते. ते अनेक पुरुषांनीं व कुटुंबांनीं जगाच्या पुढें आणले. सबंध जातीचा उत्कर्ष व तिचें ठिकाणीं अनेक गुण एका पुरुषाच्या कर्तृत्वानें, वैभवानें व भाग्यानें कसे येतात याचेंहि प्रत्यक्ष ऐतिहासिक उदाहरण कोंकणस्थांचें होय. बाळाजी विश्वनाथानें योग्य संधी पाहून शाहूचा पक्ष धरला आणि तो मराठी राज्याचा दिवाण झाला. बाजीरावानें शौर्यानें व राज्यधोरणानें हिंदुस्थानास दिपविलें व शाहूस खूष केलें. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबानें तर आपल्या मुत्सद्देगिरीनें शाहूस प्रसन्न ठेवलें आणि माहाराजांनीं राज्य चालविण्यास हाच समर्थ आहे असें पाहून त्याच्या स्वाधीन राज्य

केलें. याप्रमाणें हिंदुस्थानचें साम्राज्य भट, फडके, भानू, पटवर्धन इ. घराण्यांनीं शंभर वर्षें भोगलें आणि आपल्या कोंकणस्थ जातीस उदयास आणलें. कोंकणस्थांच्या ठिकाणीं बुद्धिमत्ता होतीच; पण शौर्य, धैर्य परदेशीं वाटेल त्या ठिकाणीं जाण्याची हिम्मत, वगैरे गुण नवीन उत्पन्न झाले किंवा अंगभूत असलेले योग्य संधी मिळतांच बाहेर पडले. आज हे लोक बहुतेक सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत. किंबहुना परदेशींही गेले आहेत. तुरळक कां होईना ते काश्मिरापासून रामेश्वरापर्यंत सर्वत्र दिसतात. मुख्य वस्ती पुणें, सातारा येथें आहे यांत नवल नाहीं. पण कोंकण हें त्यांचें मुळ वसतिस्थान अद्याप आहे, आणि अद्याप येथेंन लोकमान्य टिळकांसारखे अद्वितीय पुरुष बाहेर पडतात आणि पुढेंही पडतील.

असो. भट घराण्याच्यां उत्कर्षाबरोबर ज्या कोंकणस्थ घराण्यांचा उत्कर्ष झाला त्यांपैकीं गोखले व गोखले—रास्ते हे प्रमुख होत. रास्ते हे सातार्‍याचे सावकार, पण पेशवे बाजीराव ब्याही आणि नानासाहेब मेहुणे यांच्या अनुकूलतेनें शिपाई व सरदार कसे झाले वगैरे इतिहास रा. गोविंदराव आपटे यांनीं जमा केला आहे तो वाचनीय आहे. गोखले घराणें कोंकणस्थांत फारच मोठें असून त्यांच्या इतकी लोकसंख्या इतर घराण्याची नसावी. एकंदर कोंकणस्थांची लोकसंख्या सुमारें ८२००० आहे. त्यांत गोखले सर्वांत अधिक संख्याक आहेत. ते बहुतेक सर्व बुद्धिवान् आहेत व ते काश्यप गोत्री हिरण्यकेशी आहेत. त्यांच्या सर्वांचा इतिहास मनोरंजक असून तो रा. गोविंदराव आपटे यांनीं मोठ्या प्रयासानें एकत्र केला आहे व सध्यां हयात असलेल्या पुरुषांची एक जंत्रीहि त्यांनीं बनविली आहे ही एक नवीन गोष्ट होय. गोखले-रास्ते घराण्याशिवाय शिपाईगिरींत व स्वदेशनिष्ठेत आणि स्वदेशप्रीतींत ज्या कांहीं गोखल्यांनीं मर्दुमकी गाजविली त्या सर्वांत बापू गोखले हे प्रख्यात होत. बापूगोखल्यांनंतर शिपाईगिरींत नांव कमविण्याचा प्रसंग कोंकणस्थांना मिळाला नाहीं. पण बुद्धिमत्तेच्या कामात नांव मिळविण्याचें क्षेत्र इंग्रजींत मोठें आहे. त्यांत गोखले हे मागें नाहींत किंबहुना अग्रेसर आहेत. मुंबईचे नारायण विष्णु गोखले हायकोर्ट वकील यांचें घराणें या बाबतींत उल्लेख करण्यासारखें व माझ्या परिचयाचें आहे. सर्वांत वडील बंधू रामभाऊ गोखले हे माझ्या पाहण्यांत असून फारच बुद्धिवान् आणि शरिरानें उंच व भव्य असे होते. ते पाहिले अॅडव्होकेट झाले होते; पण दुर्दैवानें अल्पवयी झाले. त्यांच्या बंधूंपैकीं माधवराव गोखले हे माझे समकालीन असून मोठे तेजस्वी आणि तडफदार होते. प्रिन्सिपाल वर्डसवर्थ यांची त्यांवर मोठी कृपा होती. ते एम. ए. होऊन डेक्कन कालेजांत इतिहासाचे प्रोफेसर झाले होते. दुर्दैवानें तेही अल्पवयी निघाले. ते जिवंत राहते तर मवाळपक्षाला जसे आनरेबल गोखले ललामभूत झाले होते (हे त्यांचे वेळींच कॉलेजांत असून प्रारंभीं विशेष चमकत नव्हते) त्याप्रमाणें माधवराव गोखले हे राष्ट्रीयपक्षाला ललामभूत झाले असते. असो. कल्पनातरंग न

चालविले तरी माधवराव गोखल्यांचा उल्लेख या गोखले कुलाच्या इतिहासाच्या वेळीं केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. रा. गोविंद विनायक आपटे यांनीं ऐतिहासिक कोंकणस्थ घराण्यांचा इतिहास लिहिण्याचा जो उपक्रम चालविला आहे तो प्रशंसनीय असून लोकांच्या आदरास व आश्रयास सर्वतोपरी योग्य आहे. आतां ही माहिती मिळविण्यास त्यांस अतिशय श्रम पडतात या गोष्टीचा निर्देश करणें जरूर आहे. त्यांचे हे श्रम पुष्कळसे वांचण्यासारखे आहेत; ज्या त्या कुटुंबांतील लोकांनीं आपापली संपूर्ण माहिती आपण होऊन त्यांजकडे पाठविल्यास त्यांचे बरेचसे श्रम वांचतील यांत शंका नाहीं. फडके, मेहेंदळे, वगैरे घराण्यांचा इतिहास लिहिण्याचें ते काम करणार आहेत. त्यांस हिंदुस्थानाच्या सर्व भागांतील त्या त्या कुळांतल्या मंडळींनीं साधार साद्यंत माहिती कळविल्यास इतिहासलेखनाचें काम उत्कृष्ट होईल हें सांगणें नको. यासाठीं कोंकणस्थ जनतेस वरील प्रमाणें विनंती करून ही अल्प प्रस्तावना मी पुरी करतों.

कल्याण
ता० १ ऑगष्ट १९२२. } चिंतामण विनायक वैद्य.

---

# लेखकाचे विचार.

शके १८३४ ( इ. स. १९१२ ) त मी राव० सानेकृत पेशव्यांची बखर वाचली. सदरहू बखरीमध्यें सरदार नारो विष्णु आपटे हे शेवटचे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पदरीं सरदार होते. हें वाचून या लेखकास जिज्ञासा उत्पन्न झाली कीं, सर्व आपटे एक गोत्रज असल्यामुळें, आपणही सरदार आपटे यांच्यापैकींच आहोंत; अशी मनाची समजूत होऊन, त्याच्या संशोधनास सुरवात केली. आमचें कोंकणांतील मूळगांव **आजगांव** असल्यामुळें त्या गांवीं जाऊन जों चौकशी करितों तों सरदार नारो विष्णु आपटे यांचे वंशज ग्वाल्हेर येथें असून त्यांचेंही मूळगांव आजगांवच ! तेव्हां विशेष चौकशी करितां, सरदार आपटे हे या लेखकास अगदीं जवळचे म्हणजे दशांतील असल्याचें समजलें. मग "**आपटे घराण्याचा इतिहास** मी तयार करीत आहें, ज्यांचें उपनांव आपटे आहे, त्यांनीं आपली माहिती पाठवावी" म्हणून वर्तमानपत्रांत जाहिरात दिली, दहा प्रश्नांचें एक विनंतीपत्र छापिलें. विनंतीपत्रें सर्वांना पाठविलीं, आणि मी माहिती मिळविण्याकरितां प्रवास करूं लागलों. सर्व हिंदुस्थानांतील **आपटे** यांची माहिती मिळवून पुस्तक तयार केलें आणि या पुस्तकास **आपटे घराण्याचा इतिहास** हें नांव देऊन, अभिप्रायार्थ जगमान्य केसरीवर्तमान पत्राचे

संपादकांकडे पाठविलें. केसरीकारांनीं माझ्या या नवीन कल्पनेचा गौरव करून त्यांनीं या लेखकास आज्ञा केली कीं, " तुम्हीं आपल्या आयुष्यांत निरनिराळ्या ऐतिहासिक कोंकणस्थ घराण्यांची माहिती मिळवून ती पुस्तकरूपानें छापा. आणि कोंकणस्थ ब्राह्मणांचीं जीं कांहीं ४।५ ऐतिहासिक घराणीं आहेत; तीं झाल्यावर इतर ऐतिहासिक घराणीं संशोधनास घ्या. " या लोकमान्यांचे आज्ञेप्रमाणें संशोधनाचें काम चालविलें आहे. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या या अज्ञ लेखकास लोकमान्यांनीं उत्तेजन देऊन, कायमची स्फूर्ति उत्पन्न केली स्फूर्ति कायम होणें याला विशेष कारण माझ्या **आपटे घराण्याच्या इतिहासावर** त्यांनीं दिलेला अभिप्राय होय ! तो येणें प्रमाणेः—

केसरी–मंगळवार, तारीख २४ नोव्हेंबर सन १९१४ इसवी.

पुस्तकें व अभिप्राय

**आपटे घराण्याचा इतिहास**–( ले. गोविंद विनायक आपटे, धर्मपुरी वांई ):— कोंकणस्थांत आपटे, गोखले, पटवर्धन, परांजपे, रानडे, बापट, साठे इ० आडनांवांचीं जीं जुनीं व मोठीं घराणीं आहेत, त्यांचा अव्वलपासूनचा इतिहास लिहिला गेल्यास महाराष्ट्राच्या इतिहासाचें संगतवार ज्ञान होण्यास मदत होईल यांत शंका नाहीं. शिवाय आपल्या घराण्याचा पूर्वापार व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ति कशा होत्या? त्यांच्या आंगीं मुख्यत्वेंकरून कोणकोणते गुण होते? त्यांचें शील कसें होतें? त्यांच्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत जो काय फरक झाला असेल तो राष्ट्रहिताच्या दृष्टीनें कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे, यांचा तुलानात्मक दृष्टीनें विचार करण्यास अशा घराण्यांचे स्वतंत्र इतिहास बाहेर पडणें तर अत्यंत जरूरीचें आहे. अशा प्रकारचा ब्राह्मण घराण्यांचा सविस्तर व साधार इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न रा. गोविंद विनायक आपटे यांनीं केला आहे. रा. आपटे यांची प्रस्तुत कृति निःसंशय कौतुक करण्यासारखी व अनुकरणीय आहे. वंशवृक्षासह सुमारें तीनशें वर्षांपूर्वींपासूनचा आपट्यांचा इतिहास या पुस्तकांत आला आहे. कोंकणस्थांत आडनांवें कशीं पडलीं व प्रस्तुतचें आपटे हें आडनांव कां पडलें या संबंधाची माहिती पुस्तकांत नसून त्यासंबंधानें लेखकानें प्रयत्न केलेलाहि दिसत नाहीं. पण आजगांवचे मूळपुरुष विश्वनाथभट आपटे यांचाच हा वंशविस्तार आहे असें लेखकांनीं शोध करून ठरविलें आहे. हिंदुस्थानांत बहुतेक सर्व ठिकाणीं हिंडून माहिती मिळवणें व ती माहिती व्यवस्थित रीतीनें लोकांपुढें मांडणें किती खर्चाचें व श्रमाचें काम आहे, याची कल्पना पुस्तक पाहिल्यावांचून होणार नाहीं. अठराव्या शतकाच्या अखेरीस या घराण्यांत प्रसिद्धीस

आलेले व शिंद्याच्या पदरीं असलेले सरदार नारो विष्णु, बाबासाहेब व रावसाहेब आपटे यांचीं चरित्रें व फोटोहि या पुस्तकांत दिलेले आहेत. त्याच प्रमाणें आपआपल्या व्यवसायांत नांव काढलेल्या सर्व आपटे मंडळींचिहि फोटो पुस्तकांत दिलेले असून त्यांच्या त्या विशेष गुणासंबंधाची साधार माहितीहि दिली आहे. आपटयांच्या चार वंशवृक्षांचे कागदहि पुस्तकाला जोडलेले आहेत. पुस्तकाच्या शेवटीं आपटे मंडळींच्या नांवांची डायरेक्टरीसारखी सूची जोडली असती तर माहिती पाहण्यास अधिक सुलभ पडलें असतें. महाराष्ट्राच्या इतिहासज्ञानांत भर पडण्यास साधनीभूत होणाऱ्या अशा प्रकारच्या प्रयत्नांस महाराष्ट्राकडून योग्य उत्तेजन मिळेल अशी आशा आहे. पुस्तकाची किं. २। रु. आहे."

लोकमान्यांच्या आज्ञेनुरूप पुढें मी **बरवे घराण्याचा इतिहास व संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास** असे दोन इतिहास प्रसिद्ध केले. नंतर गोखले घरण्यांतील कांहीं मंडळी या लेखकास गोखले घराण्याचा इतिहास तयार करा आम्ही आपल्याला शक्य ती मदत करूं असें म्हणूं लागली. तेव्हां मी त्या मंडळींना सांगितलें कीं, रास्ते हेहि गोखलेच आहेत; तेव्हां **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास** तयार करण्याचे व गांवोगांवीं फिरून माहिती मिळविण्याचे परिश्रम कितीहि त्रासदायक असले तरी ते मी करीन परंतु या कामास द्रव्याची मदत करणारा कोणी उदार धनिक पुढारी झाल्याशिवाय मात्र हें काम मी करूं शकणार नाहीं. परंतु ती अडचण तेव्हांच दूर झाली. ती अशी:—एके दिवशीं पुणें मुक्कामीं मी श्रीमंत फर्स्टक्लास सरदार माधवराव आनंदराव ऊर्फ रावसाहेब रास्ते यांच्याकडे जाऊन, **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास** मी तयार करितों परंतु हें घराणें फार मोठें असल्यामुळें या कार्यास खर्च फार येणार, तेव्हां आपण या कार्यास प्रथमतः योग्य आश्रय द्यावा. ही माझी विनंति श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं ऐकून घेतली. आणि माझ्या प्रॉमिस-लिष्टवर श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं लेखी आर्डर दिली कीं, " **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा** इतिहास तयार करण्याचे कामीं आम्ही तुम्हांस पांचशें रुपये देण्याचें कबूल केलें असून पुस्तक तयार झाल्यावर पांच प्रति विकत घेऊन, योग्य तें बक्षीसहि देऊं " याप्रमाणें श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं या लेखकास योग्य मदत करून, सदरहू इतिहास तयार करणें भाग पाडले. या औदार्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें.

**विद्वन्मणी चिंतामणराव विनायक वैद्य** एम्. ए. एल्.एल्.बी. यांनीं या अशिक्षित अज्ञ लेखकाचे विनंतीस मान देऊन, **गोखले व गोखले-रास्ते** घराण्याच्या इतिहासाला आपली प्रस्तावना जोडून सुशोभित केलें. या बद्दल हा लेखक त्यांचा फार आभारी आहे.

नाशिक जवळील श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर येथील इनामदार श्री. रा. आपासाहेब व बाळासाहेब जोगळेकर यांच्या सहायानें तेथील वे. मू. कमळाकर रावजी शास्त्री पाटणकर, वे. मू. त्रिंबकभट घैसास वगैरे क्षेत्रोपाध्ये यांनीं वेळोवेळीं जुन्या व नव्या नामावळीच्या चोपडया माझ्याकडोन कांहीं वेतन न घेतां इतिहासाचें महत्व जाणून उतारे घेऊं दिले याबद्दल हा लेखक त्यांचा व जोगळेकर यांचा अत्यंत आभारी आहे. क्षेत्रोपाध्ये यांनीं जो जो म्हणून कोणी क्षेत्रीं येतो त्याच्याकडोन त्याच्या पूर्वजांचीं नांवें व राहण्याचें ठिकाण वगैरे माहिती घेऊन, ती माहिती ( कीर्द व खतावणी प्रमाणें ) वह्यांवर फारच व्यवस्थित नोंदिली आहे. हा त्यांचा उद्योग फार महत्वाचा व प्रशंसनीय आहे. तरी क्षेत्रीं जाणाऱ्या यात्रेकरूंनी आपापली माहिती आपल्या क्षेत्रोपाध्यास मोठ्या प्रेमानें देत जावी अशी सर्व यात्रेकरूंना मी विनंती करितों.

पुस्तकाबरोबर या घराण्याचे पांच वंशवृक्ष व विद्यमान पुरुषांची जंत्री दिली आहे. जंत्री पुस्तकांत जोडली आहे आणि वंशवृक्ष मात्र पुस्तकासोबत दिले आहेत.

---

# उपोद्घात.

## कोंकण व कोंकणस्थ

कोंकण हा शब्द कोंकण्णा या विशेषनामावरून झालेला आहे. दशावतारांतील सहावा अवतार श्रीपरशुराम याची मातोश्री कोंकण्णा ऊर्फ रेणुका होय. ह्या तिच्या कोंकण्णा ह्या नांवावरून कोंकणप्रांत झाला आहे. हा प्रांत सह्याद्रीचे पश्चिम पायथ्यापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत असून ह्या प्रांतास—कोंकणप्रांत—हें नांव पडण्याचें कारण येणें प्रमाणें:—

परशुराम हा भृगुपुत्र जमदग्नि ह्याचा मुलगा. परशुरामाच्या आईचें नांव कोंकण्णा ऊर्फ रेणुका हें असून रेणुका ह्याच नांवाची विशेषतः प्रसिद्धी आहे. तिला जमदग्नीपासून पांच पुत्र झाले. परशुराम हा त्यांपैकीं कनिष्ठ पुत्र होय. एके वेळीं रेणुका नदीवर स्नानास गेली होती. त्या ठिकाणीं गंधर्वांचें एक जोडपें जलक्रीडा करीत असलेलें तिच्या दृष्टीस पडलें. त्या देखाव्यानें तिच्या मनांत कामवासना प्रबल झाली; पुढें घरीं आल्यानंतर तिनें आपली इच्छा पतिजवळ प्रदर्शित केली. जमदग्नी हा नांवाप्रमाणें अग्नितुल्यप्रखर किंवा जहाल असल्यामुळें पत्नीच्या विषयवासनेमुळें त्याला अत्यंत कोप आला व अत्यंत निंद्य शब्दांनीं तिची निर्भत्सना करून तिचें शीर उडविण्याविषयीं आपल्या पुत्रांना त्यानें आज्ञा

केली; परंतु बापाची आज्ञा झाली असतांही आपल्या मातेचा वध करण्याला चौघां पुत्रांपैकीं एकहि तयार होईना; पुढें पांचवा पुत्र परशुराम हा आल्यानंतर जमदग्नीनें तीच आज्ञा परशुरामास केली. व त्या पितृभक्त परशुरामानें बापाची आज्ञा शिरसावंद्य मानून आपल्या हातांतील परशूनें मातोश्री रेणुकेचें शीर उडविलें. पुत्राच्या या कृत्यानें जमदग्नीचा क्रोध शांत झाला. व त्याच्यावर खूष होऊन "पाहिजे तो वर माग" असें तो परशुरामास म्हणाला; यावर पितृभक्त परंतु दयार्द्र अंतःकरणाच्या परशुरामानें "आपली मातोश्री सजीव व्हावी" असा वर मागितला व जमदग्नीनें ती गोष्ट मान्य करून रेणुकेला पुन्हां जिवंत केलें. या गोष्टीवरून पितृभक्तीप्रमाणें परशुरामाचें अंतःकरणांत मातृभक्ति किती जाज्वल्य होती ही गोष्ट उघड होत आहे.

वरील गोष्ट घडून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं कार्तवीर्य नांवाच्या महापराक्रमी राजानें जमदग्नीच्या आश्रमांत प्रवेश करून त्याची कामधेनु हरण केली. कार्तवीर्य हा माहिष्मति नांवानें प्राचीन काळीं प्रसिद्ध असलेल्या प्रांताचा राजा कृतवीर्य याचा मुलगा. कार्तवीर्यानें तीव्र तपश्चर्या करून दत्तात्रेयाला प्रसन्न करून घेऊन त्याच्यापासून अनेक वर मिळविले होते. एका वरानें त्याला सहस्र हात उत्पन्न झाले म्हणून त्याला सहस्रार्जुन असें नांव प्राप्त झालें. दुसऱ्या एका वरानें त्याला एक सुवर्णरथ मिळाला. ह्याच्या योगानें त्याला पाहिजे तिकडे संचार करतां येत असे. तिसऱ्या वरानें तो शत्रूला अजिंक्य होऊन बसला. दत्तात्रेयाच्या मिळालेल्या वरामुळें त्याच्या ठिकाणीं अद्‌भुत सामर्थ्य उत्पन्न झालें व त्याला स्वर्ग दोन बोटें उरला. या अभिमानामुळेंच याला जमदग्नीच्या आश्रमांतून कामधेनु हरण करण्याचें धाष्टर्य करतां आलें. कामधेनु हरण केली त्या वेळीं परशुराम आश्रमांत नव्हता. आश्रमांत परत आल्यावर ही हकीकत त्याला समजली. व क्रोधानें संतप्त होऊन त्यानें सहस्रार्जुनाशीं युद्ध करून त्याला ठार मारिलें. सहस्रार्जुनाचे मुलांना पित्याचे वधाची बातमी समजतांच क्रोधायमान होऊन ते जमदग्नीच्या आश्रमांत आले. व जमदग्नी आश्रमांत एकटा आहे असें पाहून त्याचा त्यांनीं एकदम वध केला. परशुराम आश्रमांत परत आल्यावर पित्याचा वध झाल्याचें पाहून त्याचा क्रोधाग्नी खवळला व त्याक्षणीं सर्व क्षत्रीयकुलाचा संहार करण्याची त्यानें घोर प्रतिज्ञा केली व त्याप्रमाणें त्यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली. वास्तविक खऱ्या क्षत्रियानें गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावा हेंच त्यांचें आद्य कर्तव्य होय. परंतु तें विसरून आणि वरप्रसादानें प्राप्त झालेल्या सामर्थ्याचे योगानें उन्मत्त होऊन सहस्रार्जुनानें तपोबलानें प्राप्त करून घेतलेल्या कामधेनूला हरण करून नेली हा पहिला अन्याय, व पुढ सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं तपोनिष्ठ जमदग्नीचा वध केला हा दुसरा अन्याय, अशा दुहेरी अन्यायानें चिडून जाऊन परशुरामानें क्षत्रिय संहाराची प्रतिज्ञा केली. अर्थात् क्षत्रियसंहाराच्य

अनर्थाचें खापर एका क्षत्रियाच्या अन्यायी उन्मत्तपणाच्या माथींच मारलें पाहिजे. परशुरामाचें क्षात्रतेज इतकें असह्य होतें कीं, प्रत्यक्ष रघुकुलोत्पन्न दशरथालाही स्त्रीवेषधारण करून ब्राह्मणाच्या आश्रमांत लपून बसावें लागलें. पुढें श्रीपरशुराम-अवतार–कृत्याची समाप्ती होण्याचे वेळीं त्यांचें व श्रीरामचंद्र यांचें तुमुलयुद्ध होऊन श्रीपरशुरामाचे शरीरांतून दिव्य ज्योत निघून ती श्रीरामचंद्राचे शरिरांत प्रवेशली. अशा रीतीनें ह्या अवताराची समाप्ती झाली. श्री परशुराम हे चिरंजीव असून सप्त चिरंजिवांमध्यें त्यांची गणना आहे. ते सप्तचिरंजीव येणेप्रमाणेः—
" अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः । कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ " श्री परशुराम हे अद्याप महेंद्रपर्वतावर तपश्चर्या करीत आहेत असा समज आहे. पित्याचे वधावरून श्रीपरशुरामाला क्षत्रियांबद्दल इतका वीट आला होता कीं, क्षत्रियांनीं ज्या भूमीमध्यें वास्तव्य केलें त्या अपवित्र भूमींत राहणें पापकारक आहे असें वाटून सह्याद्रीच्या तटावरून श्रीपरशुरामानें समुद्रावर बाण फेंकला व त्याच्या योगानें समुद्र द्वादश योजनें ( अठ्ठेचाळीस कोस ) मागें हटविला. आणि ह्या नव्या भूमीला आपल्या मातोश्रीचें स्मारक यावचंद्रदिवाकरौ कायम रहावें ह्मणून तिचें नांव या पुण्यभूमीला दिलें तेव्हांपासून या पुण्यभूमिला ' कोंकणप्रांत ' ही संज्ञा प्राप्त झाली. या कोंकण प्रांतामध्यें राहणाऱ्या ब्राह्मणांस कोंकणस्थ ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त झाली व ब्राह्मणेतरांना कोंकणे असें म्हणूं लागले.

दशावतारांपैकीं सहावा अवतार श्रीपरशुराम यांनीं समुद्रास मागें सारून जी पुण्यभूमी निर्माण केली. ती पुण्यभूमी निरोगी असून उंचसखल प्रदेश व मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष व लता आणि त्यांमधून वाहणारे स्वच्छ पाण्याचे सुंदर प्रवाह यांनीं युक्त अशी असून मोठी शोभायमान आहे. अशा या पुण्यकारक शोभायमान पुण्यभूमीस परशुरामक्षेत्र असें म्हणूं लागले. व अद्यापिहि परशुरामक्षेत्र ( परशुरामभूमी ) असें म्हणतात. परंतु विशेषतः हल्लीं या क्षेत्राचें चालू नांव कोंकणप्रांत होय. श्रीपरशुरामानें आपल्या कोंकणा मातोश्रीचें चिरकाल स्मरण राहावें म्हणून त्या परशुराम क्षेत्रास कोंकण हें नांव दिलें; तेव्हांपासून पुढें परशुरामक्षेत्र अथवा कोंकणप्रांत असें म्हणूं लागले. या कोंकणप्रांतास इंग्रजींत रत्नागिरी जिल्हा ही संज्ञा प्राप्त झाली आहे.

कोंकणप्रांतांत ( रत्नागिरी जिल्ह्यांत ) चिपळूण या नांवाचा गांव प्रसिद्ध असून तो तालुका आहे. या गांवीं व्यापारपेठ असून येथून घाटावर जाण्याचा बैलगाडीचा हमरस्ता आहे. चिपळूण गांवापासून सुमारें एक कोसावर श्रीपरशुरामक्षेत्र डोंगरावर आहे. डोंगरावर श्रीपरशुरामाचें मोठें देवालय आहे. या देवालयास लागूनच लोकवस्ती आहे. या ठिकाणीं श्रीपरशुरामजयंतीचा मोठा उत्सव होतो. चिपळून गांवीं जाण्यास दोन मार्ग आहेत; एक कऱ्हाडवरून बैलगा-

डीचा व दुसरा मुंबईहून आगबोटीचा. आगबोट चिपळूनपासून एक कोसावर गोवळकोट येथें लागतें.

श्री परशुरामकालीन ( सहाव्या अवतार कालांत ) कोकणप्रांतांत ब्राह्मणांची वस्ती होऊं लागली. " सांगरे सर्व तीर्थानि म्हणजे सर्व तीर्थांत सागर ( समुद्र ) हें तीर्थ विशेष आहे. अशा सागरांतून जी पुण्यभूमी श्रीपरशुरामांनीं उत्पन्न केली त्या पुण्यभूमींत विंध्याद्रि, सातपुडा, हिमालय, सह्याद्री, निलगिरी वगैरे अनेक पर्वतांवरील ऋषींनीं येऊन वास्तव्य केलें.

पौराणिक कालीं आडनांवें नव्हतीं असें वाटतें कारण त्या संबंधीं पौराणिक ग्रंथांत कोठें उल्लेख असल्याचें आढळून येत नाहीं. पुराणकालीं अमुक ऋषिकुलोत्पन्न म्हणजे गोत्रावरूनच सर्वांना संबोधित असावेत असें वाटतें. आतां उपनामें म्हणजे ठेवलेलीं आडनांवें ( विशेष नामें ) कोणत्या कालापासून सुरू झालीं हें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं व तसें निश्चित सांगण्यास कांहीं प्रमाणग्रंथ मिळाल्याशिवाय सांगतां येणें अशक्य आहे. आम्हां कोंकणस्थांचीं जीं मूळ साठ उपनामें चालू आहेत तीं फार अनादि आहेत. त्या मूळ साठ उपनामांत आठवेले. या उपनामाचा अर्थ " कोणी पुरुषानें आठवेल लाविले " तेव्हांपासून त्याच्या वंशास आठवेले हें उपनाम सुरू झालें. परंतु अलीकडे आठवेले न म्हणतां " आठवले " असेंच म्हणूं लागले आहेत. परंतु मूळ उपनाम "आठवेले" असेंच आहे. ह्या उपनामाचा जसा स्पष्ट बोध होतो तसा बाकीच्या मूळ उपनामांत कांहींच अर्थबोध होत नाहीं. असो.

पौराणिक कालाच्या शेवटीं व ऐतिहासिकालांत ( बादशाही व मराठे शाहींत ) मूळ साठ उपनामें जीं होतीं तीं ३०४ झालीं. सन १८५५ सालांत अमरापुरकर, जोशी व गद्रे यांनीं शिळाप्रेसमध्यें उपनामाची जी एक जंत्री छापली आहे, त्या जंत्रीवरून पाहतां मूळ उपनामें साठ असून कोण कोणत्या उपनामाचे किती भेद झाले आहेत तें उत्तम दाखविलें आहे. तो त्यांचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. सन १८५५ सालांत ६० उपनामांची ३०४ उपनामें भेदानें झालीं. आणि त्या पुढें आज सदुसष्ट वर्षांत आणखी किती तरी त्यांत भेदानें उपनामें जाहालीं असतील ! हीं नवीन जाहलेलीं उपनामें मात्र अर्थबोधक आहेत. त्यांतील जुनीं व नवीं थोडीं नमुन्याकरितां देत आहें. उदाहरणार्थ खासगीवाले, ढमढेरे, हसबनीस, रास्ते, विनीवाले, पेशवे, देशमुख, जामदार, पाटणकर, पाळकर, वेहळेकर, केळकर, सहस्त्रबुद्धे, गोडबोले, खरे. गोंधळेकर, महाबळ, टिळक, दांडेकर ओंकार, घारपुरे वगैरे पुष्कळच आहेत यावरून पाहतां मूळ साठ उपनामें फार अनादि असून त्या उपनामांचा अर्थबोध होत नाहीं. त्या नंतर मूळ उपनामांत जे भेद झाले ते भेद ऊर्फ उपनामें मात्र बहुतेक अर्थवाचक आहेत.

( ११ )

## अभिन्नत्व

गोत्रासंबंधानें विचार करीत असतांना एक महत्वाची बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, कश्यप गोत्रामध्यें ज्या ब्राह्मणांचा अंतर्भाव होतो ते फक्त कोंकणस्थच आहेत असें नाहीं. तर देशस्थ, द्राविडी, कर्नाटकी, वैष्णव, बंगाली, शेणवी वगैरे ब्राह्मण यांचाहि अंतर्भाव होतो.काश्यप गोत्राप्रमाणेंच इतर सर्व गोत्रांची तशीच स्थिति आहे. अशी स्थिति कां असावी आणि निरनिराळ्या ऋषींच्या वंशजांमध्यें आचारविचारसंबंधानें आणि खाण्यापिण्या संबंधानें इतकी भिन्नता कां उत्पन्न व्हावी असा प्रश्न उत्पन्न होतो. या संबंधाची उपपत्ति येणेंप्रमाणें असावी असें दिसतें—भिन्नभिन्न ऋषींचे वंशज भिन्नभिन्न काळीं तीर्थयात्रा वगैरे करीत असतां निरनिराळी रमणीय स्थानें पाहून त्या त्या ठिकाणीं जाऊन राहिले असावेत व त्या ठिकाणच्या भिन्न गोत्रीय ऋषींच्या वंशजांशीं शरीरसंबंध करीत असावेत व अशा रीतीनें त्या त्या प्रांतांत त्यांचा वंशविस्तार झाला असावा असें वाटतें. पुढें भिन्नभिन्न प्रांतांतील परिस्थिति–भेदामुळें ऋषींच्या या वंशजामध्यें कालमानानें खाणेंपिणें आचारविचार आणि चालिरिती वगैरे बाबतींत भिन्नता उत्पन्न व्हावी हें स्वाभाविक आहे.परंतु हे भेद सध्याच्या काळीं कितीहि वाढलेले असले तरी या भिन्नतेच्या मागें सगोत्रतेचें अभिन्नत्व आजहि दिसून येतें. ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आतां कोंकणस्थ ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, शेणवी ब्राह्मण, द्राविडीब्राह्मण, बंगालीब्राह्मण व कर्नाटकीब्राह्मण, अशीं विशेषणें जीं ब्राह्मणांनां हल्लीं चालू आहेत त्याचें मुख्यतः कारण हेंच कीं ज्या ज्या देशांत आमच्या पूर्वजांनीं वास्तव्य केलें त्या त्या देशाचें विशेषण आम्हांला प्राप्त झालें. प्रायः ब्राह्मण सर्व एक हेंच सत्य आहे.